महावितरण

# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडल कार्यालय, लातूर या आस्थापनेवर सन २०२२–२३ करिता विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात प्रशिक्षण घेण्याकरिता शिकाऊ उमेदवारांच्या एकुण **१०१** जागा भरण्यासाठी विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात आय.टी.आय. उत्तीर्ण **NCVT** झालेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दि. १६.१२.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ रात्री १२:०० वाजेपर्यंत **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेत स्थळावर खालीलप्रमाणे ऑनलाईन अर्ज करावेत.

**१) लातूर विभागासाठी आस्थापना क्र. E १२१९२७००११०**

**२) उदगीर विभागासाठी आस्थापना क्र. E ०११७२७००७३७**

**३) निलंगा विभागासाठी आस्थापना क्र. E ०११७२७००७५३**

**दि.०१.०१.२०२२ व त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

**टिप:–**

१) अर्ज करावयाची शेवटची तारीख दि. ३१.१२.२०२१ रोजी रात्री १२.०० पर्यंतची राहील.

२) उमेदवाराचे **www.apprenticeship.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराने वरीलपैकी ३ पैकी केवळ १ (एकाच) संकेतस्थळावर अर्ज करणे बंधनकारक असेल.

४) अर्ज करताना संकेत स्थळावर आवश्यक ते प्रमाणपत्रे स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक आहे.

५) दि. **३१.१२.२०२१** पर्यंत ऑनलाईन प्राप्त झालेल्या पात्र उमेदवारांची मुळ कागदपत्राची छाननी/पडताळणी दि.**२०.०१.२०२२** रोजी सकाळी **११.००** वाजता महावितरण, मंडल कार्यालय, जुने पावर हाऊस, साळे गल्ली, लातूर येथे करण्यात येईल. तरी उमेदवारांनी मुळ कागदपत्रे पडताळणी करिता येताना मुळ कागदपत्रांची छायांकित प्रती साक्षांकित करून सोबत आणावी.

६) कागदपत्रे छाननी/पडताळणी करीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

७) प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील **(१ एप्रिल ते ३१ मार्च).**

८) भरती प्रक्रियेत लोकप्रतिनीधी अथवा राजकिय व्यक्तिंकडुन दबाव आणल्यास त्यांची उमेदवारी रदद्द् करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांस राहतील.

९) निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमा प्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

१०) शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

११) सदर शिकाउ उमेदवार भरती प्रक्रियेमध्ये लातूर जिल्हा स्थानिक उमेदवारास प्राधान्य देणेत येईल.

**पी. आर. ओ. क्रमांक**
**ला.प./८०/२१–२२**

**अधीक्षक अभियंता**
**महावितरण मंडल कार्यालय, लातूर.**